प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पाचे वृत्तांकन करणाऱ्या वार्ताहर / पत्रकार यांना देण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय प्रकाशन बॅगेच्या संख्येत वाढ करणे व त्याची खरेदी करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.८८/अर्थ-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १२ जुलै, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, दि.१.१२.२०१६.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१६/प्र.क्र.२५/अर्थ-३, दि. १४.०२.२०१७ .
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि. ०२.०५.२०१९.
४) अध्यक्ष, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, मुंबई यांचे दि.१७.०६.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

राज्याचा अर्थसंकल्प विधानमंडळास सादर केल्यानंतर त्याबाबतची अर्थसंकल्पीय प्रकाशने विधानमंडळ सदस्य व इतरांना देण्यात येतात. यामध्ये राज्याच्या अर्थसंकल्पाबाबतची सविस्तर माहिती लोकप्रतिनिधी व वृत्तपत्र प्रतिनिधी मार्फत जनतेपर्यंत मिळावी या उद्देषाने अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे वाटप वार्ताहर / पत्रकार यांना करण्यात येते. जून, २०१९ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या वितरणासंबंधी बॅगांची खरेदी विहित पध्दतीने करण्यात आलेली आहे. यामध्ये वार्ताहर / पत्रकारांसाठी वाटप करावयाच्या १५० बॅगांचा समावेश आहे. प्रसिध्दी माध्यमांची वाढती संख्या पाहता अर्थसंकल्पीय अधिवेशनातील वृत्तांकन / वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांची संख्या वाढत आहे. मात्र अनेक वर्षांपासून पत्रकारांना वाटप करावयाची संख्या १५० इतकीच असून पत्रकारांची वाढती संख्या लक्षात घेता अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या वितरणासंबंधीच्या बॅगांच्या संख्येत वाढ करण्याची विनंती मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १७.०६.२०१९ पत्रान्वये केलेली आहे. या अनुषंगाने अर्थसंकल्पाचे वृत्तांकन करणाऱ्या वार्ताहर / पत्रकारांना अर्थसंकल्पीय अधिवेशनात देण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांसहीतच्या बॅगांच्या संख्येत वाढ करण्याची व सन २०१९-२०२० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पाचे वृत्तांकन करणाऱ्या वार्ताहर / पत्रकारांसाठी आवश्यक वाढीव बॅग्ज खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्याच्या अर्थसंकल्पाचे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांची वाढती संख्या तसेच वार्ताहर संघाची मागणी लक्षात घेता अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी अर्थसंकल्पाचे वृत्तांकन / वार्तांकन करणाऱ्या वार्ताहर / पत्रकार यांच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांसहीत बॅग वाटपाची संख्या १५० वरुन ती आता २०० इतकी वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन दिनांक ०२.०५.२०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रदान केलेल्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेनुसार यापूर्वी लहान बॅगांची (Brief case) खरेदी विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात आलेली आहे. यामध्ये वार्ताहर / पत्रकारांसाठी १५० लहान बॅगांचा (Brief case) समावेश आहे. सदर खरेदी करण्यात आलेल्या लहान बॅगांच्या वितरणानंतर एकूण ९ बॅगा वितरणासाठी शिल्लक राहणार आहेत. त्यामुळे आता वार्ताहर / पत्रकारांना वाढीव ५० बॅगा वितरीत करावयाच्या झाल्यास वरीलप्रमाणे वितरणासाठी शिल्लक राहिलेल्या ९ बॅगा विचारात घेता आणखी ४१ बॅगा खरेदी कराव्या लागतील. सदर ४१ लहान बॅगा (Brief

case) यापूर्वी खरेदी केलेल्या दराने खरेदी करावयाच्या असल्याने त्याकरिता रु.१,१०,३३१ इतका खर्च येणार आहे. यास्तव सदर ४१ लहान बॅगाच्या (Brief case) खरेदीसाठी रु.१,१०,३३१ इतक्या रकमेच्या खर्चास (सर्व करांसह) प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर खरेदी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या, दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयासोबतच्या सुधारीत नियम पुस्तिकेतील परिच्छेद ३.३.२ नुसार पुनर्प्रत्ययी आदेशाव्दारे व संदर्भाधीन दि. १४.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (खुद्द) खरेदी समिती मार्फत करण्यास शासन मान्यता देत आहे.

४. यावर होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष, २०५२- सेक्रेटरिएट-सर्वसाधारण सेवा, (००) ०९०, सेक्रेटरिएट, (००)(०१) वित्त विभाग (२०५२ ०२३ २), १३ - कार्यालयीन खर्च, या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग-पहिला, उप विभाग-चार, अनुक्रमांक-८ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटीस अधीन राहून तसेच प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१२१४५५२१९६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56462e610dbf070fe5eefa98886b167556f80b3731 81ed680e4c9c879d7e3617, serialNumber=14caf70544d4d2fb25d1da6ed673b0488e940 d807179c09470fcdd9192ba4ce7, cn=Vasant K. Patil
Date: 2019.07.12 15:03:18 +05'30'

(व. कृ. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. प्रधान सचिव (उद्योग) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (व्हीएलसी शाखा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. वरीष्ठ कोषागार अधिकारी, मुंबई,
१०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११. उप सचिव / अवर सचिव (रोख शाखा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. उप सचिव / अवर सचिव /कार्यासन अधिकारी, (प्रशासन-५) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.